**ठळक बातम्या**

- जनविश्वास विधेयक संमत झाल्यामुळे देशात व्यवसाय सुलभता आणि जीवनसुलभतेला मोठी गती मिळेल, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- आयएनएस तारागिरी या अत्याधुनिक युद्धनौकेचा आज नौदलाच्या ताफ्यात समावेश

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त राज्यभरात अभिवादन

**आणि**

- मुंबई-गोवा महामार्गावर नागोठण्याजवळ अपघातात दोघांचा मृत्यू, ३८ जण जखमी

**<><><><><><>**

जन विश्वास - तरतुदींमधील सुधारणा विधेयक २०२६ काल संसदेत संमत झालं. राज्यसभेत काल या विधेयकाला मंजुरी मिळाली. लोकसभेत १ एप्रिललाच हे विधेयक मंजूर झालं होतं.

या विधेयकाअंतर्गत केंद्र सरकारच्या २३ मंत्रालयांच्या अखत्यारीतील ७९ केंद्रीय कायद्यांमध्ये सुधारणांची तरतूद आहे. त्याअंतर्गत ७१७ तरतुदींमधल्या फौजदारी गुन्हेगारीचं स्वरुप काढून टाकलं गेलं आहे. तर ६७ तरतुदींमध्ये नागरिकांच्या जीवन सुलभतेच्या अनुषंगानं सुधारणा केल्या गेल्या आहेत.

हे विधेयक संमत झाल्यामुळे देशात व्यवसाय सुलभता आणि जीवनसुलभतेला मोठी गती मिळेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या विधेयकामुळे प्रलंबित प्रकरणांचा वेगानं निकाल लागेल आणि तरतुदींमधल्या फौजदारी गुन्हेगारीचं स्वरुप काढून टाकल्यामुळे न्यायालयीन खटल्यांचा भार कमी होईल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

या विधेयकाअंतर्गत केल्या गेलेल्या सुधारणांमुळे कायद्यांमध्ये सुलभता आणणं, अनुपालनाचा ताण कमी करणं आणि दंड आकारला जाण्याबद्दलची भीती

कमी करण्याच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल पडलं असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आयएनएस तारागिरी ही अत्याधुनिक युद्धनौका आज समारंभपूर्वक नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत विशाखापट्टणम इथल्या नौदलाच्या गोदीत हा समारंभ पार पडला. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडनं ही युद्धनौका बांधली असून, या युद्धनौकेची ७५ टक्के बांधणी स्वदेशी आहे. प्रोजेक्ट सेव्हनटीन ए अंतर्गतची ही चौथी नौका आहे. ही युद्धनौका अभेद्यतेची अनेक प्रगत वैशिष्ट्य आणि आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज आहे. आयएनएस तारागिरी नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्यानं, नौदलाची युद्ध सज्जता आणि तांत्रिक क्षमता वाढली आहे.

राजनाथ सिंह यांनी या समारंभाला संबोधित केलं. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी सागरी शक्ती अत्यंत महत्त्वाची असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार सागरी मार्गांनी होतो, त्यासोबतच ऊर्जा सुरक्षा देखील सागरी क्षेत्रावर अवलंबून असल्यानं, एक शक्तिशाली नौदल गरजेचं असल्याचं ते म्हणाले.

चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ अनिल चौहान, नौदल प्रमुख दिनेश त्रिपाठी आणि व्हाइस ॲडमिरल संजय भल्ला यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी आणि नौदलाचे जवान या समारंभाला उपस्थित होते.

<><><><><>

अवकाळी पावसाशी संबंधित नियमांनुसार सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्य सचिवांना दिले

आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते नागपुरात नियोजन भवन इथं वार्ताहरांशी बोलत होते.

राज्य शासनाने महसुल विभागासाठी ३५ हजार ६०० नवीन पदांना मंजुरी दिल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. या मंजुरीमुळे राज्यात ११नवीन अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालये, ८ नवीन एसडीओ कार्यालये, २ नवीन तहसीलदार कार्यालये आणि ६९ अपर तहसीलदार कार्यालये तयार होणार आहेत.

<><><><><><>

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना राज्यासह देशभरातून अभिवादन केलं जात आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्मृतीला उपमुख्यमंत्र्यांनी अभिवादन केलं आहे.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं. शिवछत्रपतींनी 'स्वराज्य' संकल्पनेला मूर्त रूप देऊन लोकाभिमुख सुशासनाचा आदर्श निर्माण केला, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

विधान भवनातल्या शिवरायांच्या पुतळ्याला विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

पुण्यतिथीनिमित्त केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी त्यांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराजांनी धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी लोकांना संघटित करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, असं शहा यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

शिवरायांचे तेजस्वी विचार, दूरदर्शी नेतृत्व आणि अतुलनीय कर्तृत्व आजही या मातीच्या कणाकणात जिवंत आहे, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शिवरायांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

गुडफ्रायडे निमित्त आज येशू ख्रिस्तांचं स्मरण केलं जात आहे. देशभरातल्या चर्चेसमधे प्रार्थना केली जात असून मोठ्या संख्येने भाविक एकत्र जमले आहेत.

गुडफ्रायडेच्या निमित्ताने प्रेम, करूणा आणि क्षमाशीलता या येशू ख्रिस्तांच्या संदेशाचं स्मरण सर्वजण करत असल्याचं उप राष्ट्रपती सी पी राधाकृष्णन म्हणाले.

गुडफ्रायडेचा दिवस येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचं स्मरण करणारा दिवस असून यानिमित्ताने सर्वांमधे करूणा आणि क्षमाशीलता हे गुण वाढीस लागो अशी प्रार्थना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली.

<><><><><>

मुंबई-गोवा महामार्गावर नागोठण्याजवळील सुकेळी खिंडीत आज पहाटे एका खासगी स्लीपर कोच बसचा अपघात झाला. या अपघातात २ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर सुमारे ३८ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींपैकी ८ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. तीव्र वळणावर चालकाचं वाहनावरचं नियंत्रण सुटल्यानं बस पलटी होऊन हा अपघात झाला. जखमी प्रवाशांवर नागोठणे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि कळंबोलीतल्या एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

<><><><><>

जागतिक वारसा स्थळ असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या अजिंठा लेणी परिसरात आज मधमाश्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. या घटनेत सुमारे ८२ पर्यटक जखमी झाले. गेल्या दोन महिन्यांतली ही सहावी घटना आहे. लेणी परिसरात सुमारे १३ मधमाश्यांची पोळी असून, ती स्थलांतरित करण्याची मागणी गेल्या दोन

महिन्यांपासून होत आहे. प्रशासनानं यावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

<><><><><><>

धुळे जिल्ह्यात काल पुन्हा एकदा वादळी पाऊस आणि गारपीट झाली असून सुमारे ९ हजार हेक्टर जमिनीवरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. काही ठिकाणी घराची पडझड झाली असून आंबा बागांचं नुकसान झालं आहे, काढणीला आलेला उन्हाळी कांदा, गहू, हरभरा आणि मका जमिनदोस्त झाला आहे. शिरपूरच्या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात वादळी पावसामुळे धान्य पाण्यात भिजून मोठे नुकसान झाले आहे. खासदार डॉ.शोभा बच्छाव यांनी केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेऊन केंद्र सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी, अशी मागणी केली आहे.

<><><><><><>

शिधावाटप विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता पथकानं काल छत्रपती संभाजी नगर इथं मोठी कारवाई करत एलपीजी गॅस चोरीचा प्रकार उघडकीस आणला आहे. तपासानंतर घटनास्थळावरून एकंदर ३५ हजार २२० किलो एलपीजी गॅस, २ टँकर आणि २६ सिलेंडर असा सुमारे १ कोटी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

<><><><><><>

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत कार्यरत एका लिपिकाला महिला कर्मचाऱ्यांचं लैंगिक शोषण केल्याच्या आरोपावरून निलंबित करण्यात आल्याची माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.

//<><><><><><>//